RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# नांदेड जिल्ह्यातील सामान्य भूमी भूमिउपयोजन

**प्रा.पुरी एन.एन.,**सहाय्यक प्राध्यापक, स्वामी विवेकानंद महा. शिरुर ताजबंद, अहमद्पूर , जि.लातूर -४१३५१७

## १.१ प्रस्तावना :

मराठवाड्याच्या पूर्वेकडील नांदेड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८०१६’ ते १९° ५५’ उत्तर अक्षवृत्त व ७६° ५६’ ते ७८° १९’ पूर्व रेखावृत्त यांच्या दरम्यान आहे. नांदेड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०५२८ चौ. कि.मी. आहे. २०११ च्या जनगणनेनूसार जिल्ह्याची लोकसंख्या ३३,५६,५६६ एवढी आहे. राज्याच्या तुलनेत नांदेड जिल्ह्याचे लोकसंख्या प्रमाण २.९६ टक्के आहे. तर जिल्ह्याचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३.४२ टक्के एवढे आहे.

जिल्ह्याच्या क्षेत्रापैकी २११.१ चौ.कि.मी.(२.०१ टक्के) क्षेत्र नागरी भागाचे असून १०२९८.९ चौ.कि.मी.(९७.९९ टक्के) ग्रामीण भागाचे आहे. महाराष्ट्रात क्षेत्रफळाच्या बाबतीत जिल्ह्याचा १४ वा क्रमांक लागतो तर लोकसंख्येच्या बाबतीत १२ वा क्रमांक लागतो.




## १.२ उद्दिष्ट्ये

१. नांदेड जिल्ह्यातील सर्वसामान्य भूमिउपयोजन अभ्यासणे.

२. अभ्यासक्षेत्रातील तहसीलनिहाय भूमिउपयोजन अभ्यासणे.

३. नांदेड जिल्ह्यातील सर्वसामान्य भूमिउपयोजनातील झालेला बदल अभ्यासणे.

## १.३ माहिती संकलनाचे स्त्रोत व अभ्यास पद्धती :

‘नांदेड जिल्ह्यातील सर्वसामान्य भूमिउपयोजन’ अभ्यासण्यासाठी २०११ या कालावधीतील माहितीचा आधार घेतला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी दुय्यम आकडेवारीचा आधार घेतला आहे. दुय्यम स्वरूपाची माहिती ही जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन २०११ नांदेड जिल्हा जनगणना पुस्तिका २०१०, नांदेड जिल्हा गॅझेटियर २०११, जिल्हा कृषी विभाग, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद, कृषी अधिक्षक कार्यालय, नांदेड. कृषी विभाग वार्षिक अहवाल,शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अहवाल, मासिके व इंटरनेट इत्यादी मधून घेतलेली आहे.

## १.४ विषय विवेचन :

देशातील एकूण भूमीचा विविध भौगोलिक घटकासाठी झालेला वापर म्हणजेच भूमिउपयोजन होय. भूमीच्या प्रत्येक तुकड्याचा पर्याप्त मात्रेपर्यंत वापर करणे म्हणजेच भूमिउपयोजन होय. नांदेड जिल्ह्यातील सर्वसामान्य भूमिउपयोजन पाच प्रकारामध्ये विभाजन करण्यात आलेले आहे. ते पुढीलप्रमाण जंगलव्याप्त क्षेत्र, शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र, पडीक क्षेत्र   पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र  लागवडीखालील निव्वळ क्षेत्र

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**तहसीलनिहाय सामान्य भूमिउपयोजन**

**१) जंगलव्याप्त**

अभ्यास क्षेत्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र१०३३११४ हेक्टर आहे. त्यापैकी ९१७७८ हेक्टर८.८८ टक्के जंगलव्याप्त क्षेत्राने व्यापलेले आहे. तहसिल निहाय सर्वात जास्त जंगलव्याप्त किनवट तालुक्यामध्ये२९.४२ टक्के एवढेअसून सर्वात कमी क्षेत्र धर्माबाद तहसिल मध्ये ०.९३ टक्के एवढे पहावयास मिळते.

**२) शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र** एकुण भौगोलिक क्षेत्रापैक ५.६८ टक्के एवढे क्षेत्र या विभागाने व्यापलेले पहावयास मिळते. यामध्ये अनुउपजावू, विविध वाहतूक मार्गासाठी उपयोगात आणलेली कॅनाल आणि वस्तीसाठी उपयोगात आणलेली जमीन पहावयास मिळते. त्यापैकी लोहा तहसीलमध्ये सर्वात जास्त क्षेत्र८.३८ टक्के असून सर्वात कमी बिलोली तालुक्यात ३.६३ टक्के क्षेत्र या तालुक्यात आढळून येते

तक्ता क्र. १.१

**नांदेड जिल्हा भूमी भूमिउपयोजन**

| .अक्र | भूमी भूमिउपयोजन | ङक्के |
|---|---|---|
| १ | जंगलव्याप्त | ८.८८ |
| २ | शेतीलाउ पलब्ध नसलेले क्षेत्र | ५.६८ |
| ३ | पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र | ३.१४ |
| ४ | पडीक क्षेत्र | ८.२५ |
| ५ | लागवडीखालील निव्वळ क्षेत्र | ७४.०५ |
| | एकुण | १०० |

स्त्रोत : जिल्हा सामाजिक वअ ार्थिक समालोचन११-२०१०

**नांदेड जिल्हा सामान्य भूमी भूमिउपयोजन**




स्त्रोत : संशोधकाद्वारे संकलित केलेल्याअ धिकृत माहितीवरअ ाधारित.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तक्ता क्र. १.१

**नांदेड जिल्हा**

**तहसील निहाय भूमिउपयोजन**

| अ क्र | तालूके | एकूण भौगोलिक क्षेत्र | जंगलव्याप्त क्षेत्र | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र | पडीक | पडीक जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र | लागवडी खालील निव्वळ क्षेत्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **माहूर** | २.०९ | २.७३ | ६.३९ | १६.३२ | ३.९९ | ७०.५७ | १०० |
| २ | **किनवट** | १७.९ | २९.४२ | ६.२० | १.५१ | ३.०९ | ५९.७८ | १०० |
| ३ | **हिमायतनगर** | ४.६६ | ७.३२ | ६.९९ | ७.०१ | ०.७० | ७७.९९ | १०० |
| ४ | **हादगाव** | १०.१ | ७.१८ | ६.८५ | ६.४१ | ०.६९ | ७८.८६ | १०० |
| ५ | **अर्धापूर** | २.७८ | १.८९ | ५.०५ | ९.२३ | ३.९० | ७९.९३ | १०० |
| ६ | **नांदेड** | ३.५६ | १.८७ | ५.०२ | १८.३८ | ३.८८ | ७०.८५ | १०० |
| ७ | **मुदखेड** | ३.३२ | १.८५ | ४.९६ | १५.४१ | ३.८३ | ७३.९५ | १०० |
| ८ | **भोकर** | ६.४४ | १०.८९ | ४.८५ | ७.४१ | १.३९ | ७५.४६ | १०० |
| ९ | **उमरी** | ४.०३ | १४.२३ | ४.९६ | ८.३५ | १.४२ | ७१.०५ | १०० |
| १० | **धर्माबाद** | ३.२९ | ०.९३ | ३.६६ | २०.३९ | ६.६१ | ६८.४१ | १०० |
| ११ | **बिलोली** | ५.५ | २.६८ | ३.६३ | ५.८२ | ६.५४ | ८१.३२ | १०० |
| १२ | **नायगाव** | ५.५४ | २.६८ | ३.६९ | १०.३१ | ६.६६ | ७६.६५ | १०० |
| १३ | **लोहा** | ७.८५ | २.७८ | ८.३८ | ११.८७ | ७.१२ | ६९.८५ | १०० |
| १४ | **कंधार** | ७.८४ | ३.४६ | ६.७८ | ७.५२ | १.४८ | ८०.७६ | १०० |
| १५ | **मूखेड** | ९.०४ | ३.०५ | ४.४१ | ८.९७ | १.७५ | ८१.८२ | १०० |
| १६ | **देगलूर** | ६.५३ | १.४२ | ५.१५ | ८.२६ | १.८२ | ८३.३४ | १०० |
|  | **एकूण** | **१००** | **८.८८** | **५.६८** | **८.२५** | **३.१४** | **७४.०५** | **१००** |

स्त्रोत : जिल्हा सामाजिक वअ ार्थिक समालोचन२०१०




**नांदेड जिल्हा**
**तहसीलनिहाय भूमिउपयोजन**

**३) पडीक क्षेत्र**

अभ्यास क्षेत्रातील पडीक क्षत्राचे जिल्ह्याच्या एकून क्षेत्रफळाशी प्रमाण ८.२५ टक्केअ ाहे. त्यामध्ये सर्वात जास्त प्रमाण धर्माबाद तालुक्यामध्ये २०.३९ टक्के क्षेत्र असून सर्वात कमी १.५१ टक्के क्षेत्र किनवट तालुक्यातआढळून येते.

**४) पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र**

नांदेड जिल्ह्यामध्ये पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र जिल्ह्याच्या एकून भौगोलिक क्षेत्रफळाच्या ३.१४टक्के एवढे आहे. त्यापैकी सर्वाधिक क्षेत्र लोहा तालुक्यामध्ये७.१२ टक्के सून सर्वात कमी ०.६९ टक्के क्षेत्र हदगाव तालुक्यामध्ये आढळून येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**५) लागवडीखालील निव्वळ क्षेत्र**

जिल्ह्याच्या एकून भौगोलिक क्षेत्रापैकी ७४.०५) टक्के एवढे क्षेत्र विविध प्रकारच्या पिकाखाली उ पयोगात आणले गेलेलेआहे. त्यामध्येअन्नधान्य, तृणधान्य, तेलवर्गीय,नगदी पिकेअ ाणि बागायती पिके यांचा समावेश होतो. जिल्ह्यामधील लागवडीखालील निव्वळ क्षेत्राचे सर्वाधिक प्रमाण ८३.३४टक्के देगलूर तालुक्यामध्ये पहावयास मिळते. तर सर्वात कमी क्षेत्र किनवट ५९.७८ टक्के तालुक्यामध्ये दिसून येते.

**१.५ निष्कर्ष** :

अभ्यास क्षेत्राचे एकून भौगोलिक क्षेत्र १०३३११४ हेक्टर आहे. त्यापैकी९१७७८ हेक्टर ८.८८ टक्के जंगलव्याप्त क्षेत्राने व्यापलेले आहे. तहसीलनिहाय सर्वात जास्त जंगलव्याप्त किनवट तालुक्यामध्ये २९.४२ टक्के एवढे असून सर्वात कमी क्षेत्र धर्माबाद तहसिलमध्ये ०.९३ टक्के एवढे पहावयास मिळते.

शेतीला उपलब्ध नसलेले सर्वात जास्त क्षेत्र लोहा तहसीलमध्ये ८.३८ टक्के असून सर्वात कमी बिलोली तहसीलमध्ये ३.६३ टक्के क्षेत्र या तालुक्यात आढळून येते.

अभ्यास क्षेत्रातील पडीक क्षत्राचे सर्वात जास्त प्रमाण धर्माबाद तालुक्यामध्ये २०.३९ टक्के सर्वात कमी किनवट तहसीलमध्ये १.५१ टक्के क्षेत्र या तालुक्यात आढळून येते.

नांदेड जिल्ह्यामध्ये पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र लोहा तालुक्यामध्ये ७.१२ टक्के असून सर्वात कमी ०.६९ टक्के क्षेत्र हदगाव तालुक्यामध्ये आढळून येते.

जिल्ह्यामधील लागवडीखालील निव्वळ क्षेत्राचे सर्वाधिक प्रमाण ८३.३ टक्के देगलूर तालुक्यामध्ये पहावयास मिळते. तर सर्वात कमी क्षेत्र किनवट ५९ टक्के तालुक्यामध्ये दिसून येते.

**१.६ संदर्भ:**

१ महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ, पुणे.
२ भारतीय जनगणना.२०११
३ नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.२०१२-१९९१
४ कृषि मार्गदर्शिका२०११ उपविभागीय कृषि कार्यालय,नांदेड
५ जलसंपदा विभाग, जिल्हा पुस्तिका नांदेड२०१२
६ जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालय, नांदेड
७ जिल्हा परिषद कृषि कार्यालय, नांदेड
८ Nanded district Gazetier 2012.